# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

भारतामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्थापना दिनांक २४ सप्टेंबर १९६९ झाली. आमच्या महाविद्यालयात हा विभाग सुरू होऊन ३० वर्षापेक्षा अधिक काळ लोटला आहे म्हणजे महाविद्यालयातून आतापर्यंत सुमारे ५०,००० पेक्षा जास्त राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक बाहेर पडले आहेत. या तीस वर्षात या विभागातर्फे महाविद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थिनी व समाजासाठी उपयोग अनेक कामे व उपक्रम हाती घेऊन यशस्वीरीत्या पार पाडले आहेत.

आजरोजी या विभागात ३ युनिट्स कार्यरत असून मुंबई विद्यापीठाने निर्धारित केल्याप्रमाणे २५० विद्यार्थी-विद्यार्थिनी या विभागात सहभागी होत आहेत. हा विभाग आपत्कालीन व्यवस्था, जल व्यवस्थापन, जलसाक्षरता, जलसंवर्धन, ग्रामस्वच्छताद्व आरोग्य व स्वच्छता, वृक्षबांधणी व वृक्षलागवड, कल्पवृक्ष दारोदारी, योगप्रशिक्षण अशा अनेक प्रकल्पातून ग्रामसुधारता व समाजसेवा यासाठी प्रयत्नरत आहे. या विभागातर्फे दर वर्षी विविध दत्तक गावांमधुन ७ दिवसाच्या निवासी शिबिराचे आयोजन केले जाते.

मागील वर्ष २०१६-१७ पासुन या विभागाने चार मोठे प्रकल्प हाती घेतले आहे. यामध्ये

१. संपूर्ण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना योगा प्रशिक्षण, आरोग्य सुधार शिबिरे व प्राथमिक उपचार प्रशिक्षण.
२. कल्पवृक्ष दारादेरी प्रकल्पामध्ये संगमेश्वर तालुक्यातुन येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या घरी, प्रत्येक २ नारळ रोपे, सार्वजनिक ठिकाणी नारळ लागवड करून येत्या ५ वर्षात सुमारे ४००० कल्पवृक्षाची लागवड करणे.
३. प्लॅस्टिक मुक्त संगमेश्वर तालुका व कापडी पिशव्या तयार करून याचे वाटप.
४. चिमण्या बचाव कार्यक्रमासाठी पक्षी पानवटे तयार करणे.

राष्ट्रीय सेवा योजनेत कार्यरत प्राध्यापक व विद्यार्थी

१. प्रा. सौ. पुजारी स्नेहलता
२. प्रा. श्री. जाधव अजित
३. प्रा.श्री. सोनावणे सुनिल
४. प्रा. श्री. जाधव प्रशांत

व २५० विद्यार्थी विद्यार्थिनी स्वयंसेविका